Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१–२२–२२७८ ५००० • फॅक्स: +९१–२२–२२७८ ५१११ • ई–मेल: investor_relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८ व कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २०, सुधारित, आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन व डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट) अधिनियम, २०१५ मधील नियम ४४ अन्वये, कंपनी आपल्या सदस्यांना गुरूवार, १ सप्टेंबर २०१६ रोजी सकाळी ११:०० वाजता बिरला मातुश्री सभागार, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, बॉम्बे हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेन्टर जवळ, न्यू मरिन लाईन्स, मुंबई – ४०० ०२० येथे होणाऱ्या कंपनीच्या बेचाळिसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (''सभा'') मंजुर करण्याच्या प्रस्तावित ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करता यावे यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य सभेच्या ठिकाणाऐवजी इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीचा उपयोग करून आपले मतदान करू शकतात ('दूरस्थ ई–मतदान') कंपनीने ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटड (''कार्वी'') यांची सेवा उपलब्ध करून घेतली आहे.

दूरस्थ ई–मतदान आणि युजर आयडी व पासवर्ड ह्यासंबंधी पत्र व सभेची माहिती देणाऱ्या सूचनेची प्रत सदस्यांना पाठविण्यात आली आहे. हे पत्र आणि सभेची सूचना कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर **https://evoting.karvy.com** येथे उपलब्ध आहे.

**दूरस्थ ई–मतदान सुविधा रविवार, २८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) वाजता सुरू होईल आणि बुधवार, ३१ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ) वाजता बंद होईल. ह्या तारखेनंतर आणि वेळेनंतर दूरस्थ ई–मतदान करण्याची परवानगी नाही.**

**गुरुवार, २५ आगस्ट २०१६ ह्या अंतिम मुदतीच्या तारखेला ज्या सदस्यांचे/लाभधारकाचे नाव कंपनीच्या रजिस्टरवर असेल फक्त तेच दूरस्थ मतदानास/सभेच्या ठिकाणी मतदान करण्यास पात्र असतील.**

सभेची सूचना पाठविल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि समभाग धारण करत असल्यास, त्यांनी **evoting.ril@karvy.com** येथे विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड मिळवावा. यूजर आयडी व पासवर्ड मिळविण्याची तपशिलवार पद्धती सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे जी कंपनीच्या वेबसाईटवर आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. जर सदस्याने कार्वी यांचेपाशी ई–मतदानासाठी अगोदरच नोंदणी केली असेल तर तो त्या युजर आयडीचा आणि पासवर्डचा उपयोग दूरस्थ मतदान करण्यासाठी करू शकतो.

ज्यांनी दूरस्थ मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले असेल असे सदस्य सभेला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे ('इन्स्टा पोल') मतदान करण्याची सुविधा सभेच्या वेळी उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी दूरस्थ ई–मतदान पद्धतीने आपले मतदान केले नाही असे सभेला उपस्थित राहणारे सदस्य सभेच्या वेळी 'इन्स्टा पोल' पद्धतीने मतदान करू शकतील.

ई–मतदानासंबंधी चौकशीसाठी/तक्रारीसाठी खालील संपर्काच्या तपशिलाची नोंद घेण्याची विनंती सदस्यांना करण्यात येत आहे:

श्री. एस्. पी. वेणूगोपाल – डेप्यूटी जनरल मॅनेजर, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैद्राबाद ५०० ०३२, दूरध्वनी क्र.: +९१–४०–६७१६ १७००, टोल फ्री नं. १८००–३४५४–००१, ई–मेल: evoting.ril@karvy.com

संचालक मंडळाचे आदेशाने
सही/–
के. सेथुरामन
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंम्पलायन्स ऑफिसर

ठिकाण : मुंबई
दिनांक : ८ ऑगस्ट, २०१६